गुजरातच्या सि.एम. डॅशबोर्ड चा अभ्यास करण्यासाठी अहमदाबाद दौरा.

सि.एम.– डॅशबोर्ड गुजरात यांचा अभ्यास करण्यासाठी दिनांक 26 सप्टेंबर रोजी प्रस्तावित अभ्यासगटाने अहमदाबाद येथे भेट दिली. यावेळी उद्योग मंत्री श्री. उदय सामंत, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्री. विकास खारगे, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाच्या व्यवस्थापक श्रीमती जयश्री भोज, मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्यकारी अधिकारी आशिष कुलकर्णी, उपमुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी कौस्तुभ धवसे यांची उपस्थिती होती.

यावेळी गुजरातच्या सनदी अधिकारी, मा मुख्यमंत्री यांच्या सचिव श्रीमती अवंतिका सिंग, गुजरातच्या मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी श्री. एम. डी. मोदीया, श्री. योगेंद्र देसाई, श्री. प्रशांत त्रीपाठी, एनआयसीचे वरिष्ठ तांत्रीक संचालक आनंद शहा, वरिष्ठ प्रणाली विकासक श्री. शैलेश खनेश यांनी गुजरात शासनाच्या सि.एम. डॅशबोर्डबाबत सादरीकरण केले.

सि.एम. डॅशबोर्ड गुजरात यांचा अभ्यास करण्यासाठीच्या अभ्यासगटाने सि.एम. डॅशबोर्ड बाबात विस्तृत माहिती जाणून घेतली. या डॅशबोर्डच्या आधारे महाराष्ट्रातही सि.एम. डॅशबोर्ड ही संकल्पना कशी राबविता येईल यादृष्टीने अभ्यासगटातील सहका-यांच्या मदतीने प्रयत्न करू असे यावेळी सांगितले.